रविवार दि.७ एप्रिल २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २२६
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत
संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com
Lokneta News - लोकनेता न्युज
8459977904
www. lokneta.com

## अखेर महायुतीचा कल्याणचा उमेदवार ठरला!

# श्रीकांत शिंदेंना पुन्हा उमेदवारी, देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

लोकनेता न्यूज नेटवर्क
मुंबई (वृत्तसंस्था)

कल्याण लोकसभा मतदार संघात अखेर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र तथा विद्यमान खासदार श्रीकांत शिंदे यांना महायुतीची उमेदवारी जाहीर झाली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. शिंदेंना निवडून आणण्यासाठी भाजप पूर्ण ताकद लावेल, असे ते म्हणाले. त्यांच्या या घोषणेमुळे या महत्त्वाच्या मतदार संघात कुणाला उमेदवारी मिळणार? याचा सस्पेन्स संपला आहे. दरम्यान, श्रीकांत शिंदे यांची महाविकास आघाडीच्या ठाकरे गटाच्या उमेदवार वैशाली दरेकर राणे यांच्याशी थेट लढत होईल.

दरम्यान काल रात्री भाजप आमदार गणपत गायकवाड यांच्या समर्थकांनी कल्याणमध्ये श्रीकांत शिंदे यांना उमेदवारी मिळाली तर त्यांचे काम करणार नसल्याची भूमिका घेतली होती. त्यामुळे आता देवेंद्र फडणवीस यांच्या घोषणेनंतर स्थानिक पदाधिकारी कोणती भूमिका घेतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.नागपूर इथे भाजपच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमानंतर माध्यमांशी संवाद साधला. यावेळी फडणवीस म्हणाले, श्रीकांत शिंदे यांना भाजपकडून विरोध नाही. ते कल्याणमधून शिवसेनेचे उमेदवार असणार आहेत, ते महायुतीचे उमेदवार असणार आहेत. भाजप त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभी राहणार आहे. पूर्ण ताकदीने आणि मागच्यावेळपेक्षा जास्त मतांनी श्रीकांत शिंदे यांना आम्ही सर्वजण आमची बृहद युती निवडून आणेल.भाजपकडून श्रीकांत शिंदे यांच्या उमेदवारीला विरोध नाही. श्रीकांत शिंदे हे कल्याणधील शिवसेना आणि महायुतीचे उमेदवार असणार आहेत. भाजप श्रीकांत शिंदे यांच्या पाठिशी उभी राहणार आहे. पूर्ण ताकदीनं आणि मागील पेक्षा अधिक मतांनी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, रिपाई, रासपा ही युती श्रीकांत शिंदेंना निवडून आणेल, असे फडणवीसांनी म्हटले आहे.त्यामुळे आता कल्याणमधून श्रीकांत शिंदे हेच



लोकसभेचे महायुतीचे उमेदवार असतील याची आता घोषणा झाली आहे. त्यामुळे या मतदारसंघात आता शिंदे गटाकडून श्रीकांत शिंदे विरुद्ध ठाकरे गटाकडून वैशाली दरेकर राणे यांच्यात सामना पहायला मिळणार आहे.कल्याणमधून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र श्रीकांत शिंदेंना उमेदवारी दिली गेली तर भाजपचा एकही कार्यकर्ता त्यांच्यासाठी काम करणार नसल्याची आक्रमक भूमिका भाजपच्या स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी घेतली आहे.भाजपचे आमदार गणपत गायकवाड यांच्या कार्यालयात भाजपचे स्थानिक नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते, तसेच आमदार गायकवाड यांच्या समर्थकांची एक बैठक पार पडली. या बैठकीत श्रीकांत शिंदेंच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. कल्याण लोकसभेची जागा भाजपला मिळावी या करता कल्याण पूर्वेत ही भाजप कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. लोकसभेची जागा भाजपलाच मिळावी यासाठी पदाधिकाऱ्यांची निर्णय आणि चर्चा झाल्याची जोरदार चर्चा आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुलाला उमेदवारी नाही मिळाली तर मी राजकीय संन्यास घेईन, ठाकरे गटाने विनायक राऊत यांनी याची काळजी करू नये, असे शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी म्हटले आहे. तर विनायक राऊत यांनी आपल्या पायखाली काय जळत आहे ते आधी पाहावे, मला विनायक राऊत यांच्या बद्दल आदर आहे. कालच मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत बसलो होतो, तिकीट वाटपात कोणतीही अडचण नाही. खोटे बोल पण रेटून बोल असे करू नका, तुम्ही जबाबदार नेते आहात, असा टोलाही त्यांनी लगावला आहे.

### नगरसेवक सौदागर यांचा एक फोन गेला...

## आ.धस यांच्या आदेशाने वरिष्ठ महावितरण अधिकाऱ्यांनी बसविली नवीन विद्युत डीपी

लोकनेता न्यूज नेटवर्क
पाटोदा । प्रतिनिधी

सध्या एप्रिल महिन्याचे कडक उन्हाचे दिवस असुन त्या मध्ये प्रमुख्याने मुस्लिम समाजाचा पवित्र माहे रमजानचा महिना सुरू असुन त्या मध्ये दिनांक ५ एप्रिल शुक्रवार रोजी प्रभाग क्रमांक ८ मधील नगर पंचायत जवळील विद्युत डीपी जळाली होती. रमजान च्या पवित्र महीन्यात लोकांची गैरसोय होऊ नये म्हणुन नगरसेवक आसेफ सौदागर यांनी आमदार सुरेश आण्णा धस यांना फोन वरून रमजानचा महिना चालू आहे व माझ्या वार्डात बहुसंख्येने मुस्लिम समाज बांधव असल्याने रोजे (उपवास) ठेवणाऱ्या ग्रामस्थांचे लाईट विना हाल होतील तरी येथे नवीन डिपी बसविणे अत्यंत गरजेचे असल्याची कल्पना दिली आणि तात्काळ आमदार सुरेश आण्णा धस यांनी वरिष्ठ महावितरण अधिकाऱ्यांना फोन करून नवीन विद्युत डीपी अद्यावत करण्या संदर्भात



आदेशीत केल्याने महावितरणाच्या कर्मचाऱ्यांनी युध्द पातळीवर कार्य करीत नविन डिपी बसविली व विद्युत पुरवठा सुरळीतपणे सुरू केला. आमदार सुरेश आण्णा धस यांनी तात्काळ प्रश्न मार्गी लावल्याने नगरसेवक आसेफ सौदागर सह या भागातील नागरिकांनी आमदार धस यांचे आभार व्यक्त केले आहे.

## पैठण, पंढरपूर रखडलेला मार्ग त्वरित पूर्ण करा, उच्च न्यायालयामध्ये जनहितार्थ याचिका दाखल

### उच्च न्यायालयाची केंद्र सरकार सह प्रतिवादी यांना नोटीस

लोकनेता न्यूज नेटवर्क
पाटोदा । प्रतिनिधी

पैठण, पंढरपूर पालखी मार्ग २०१७ रोजी राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित होऊन सदरील कामाच्या निविदा निघून काम सुरू करण्यात आले होते. सदरील ७५२ राष्ट्रीय महामार्ग पैठण, मुंगी, बोधेगाव, घोणसपारगाव, उखंडाचकला, बीड सांगवी, शिरूर कासार, राक्षस भुवन, खोल्याचीवाडी, कारेगाव, डोंगरकिन्ही, चुंबळी, पाटोदा, पारगाव(घुमरा), दिघोळला जोडला जाऊन पुढे तो खर्डा मार्गे पंढरपूर कडे जाणार आहे. सदरील मार्गाचे काम सुरू होऊन जवळपास सात वर्षे झालेली आहेत. परंतु अनेक ठिकाणी सदरील मार्गाचे कामे अपूर्ण स्थितीत पडलेले असून रोड खोदल्यामुळे लोकांना धुळीचा व खड्ड्याचा त्रास होत आहे. अनेक ठिकाणी पुल कम्प्लीट झालेले नाहीत. सदरील पैठण, पंढरपूर मार्गामुळे या भागातील लोकांना दळण वळणासाठी अत्यंत जवळचा व चांगला मार्ग असल्यामुळे व मुख्यतः वारकऱ्यांना पैठण ते पंढरपूर या वारी करण्यासाठी अत्यंत सुखकर मार्ग होणार आहे. परंतु गेल्या ७ वर्षांमध्ये सदरील काम वेगवेगळ्या कारणाने व संबंधित ठेकेदार तसेच अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे पेंडिंग पडलेले आहे. या संदर्भामध्ये पाटोदा येथील महादेव नाना नागरगोजे, ह.भ.प.रामकृष्ण गणपतराव रंधवे, चक्रपाणी लक्ष्मणराव जाधव यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जिल्हाधिकारी बीड, सहाय्यक अभियंता राष्ट्रीय महामार्ग उपविभाग माजलगाव यांना वारंवार निवेदने देऊन सदरील काम लवकरात लवकर करावे अश्या विनंत्या केल्या होत्या



तसेच या पूर्वी सदरील रखडलेल्या मार्गा संदर्भामध्ये काँ.महादेव नागरगोजे यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन व मोर्चे काढण्यात आले होते. त्या नंतर संबंधित अधिकाऱ्यांनी वरील काम ऑगस्ट-२०२३ पर्यंत करण्यात येईल असे आश्वासनही दिले होते. परंतु त्या नंतरही सदरील काम पूर्ण करण्यात आलेले नाही व त्या मुळे लोकांचे अतोनात हाल होत आहेत. या सर्व बाबींचा विचार करून वरील तिघांनी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठांमध्ये जनहितार्थ याचिका क्रमांक २२/२०२३ अँड.नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांच्या मार्फत दाखल केली होती. सदरील याचिकेची सुनावणी दिनांक-०४/०४/ २०२४ रोजी मा.न्यायमूर्ती आर.वा.घुगे आणि मा. न्यायमूर्ती आर.एम.जोशी

यांच्या पुढे झाली असता मा.उच्च न्यायालयाने वरील प्रकरणात खालील प्रतिवादींना नोटीसा काढल्या आहेत. १) सचिव रस्ते परिवहन व राष्ट्रीय महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली, २) सचिव रेल्वे विभाग नवी दिल्ली, ३) सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई, ४) कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण सार्वजनिक विभाग पदमपुर औरंगाबाद, ५) सहाय्यक अभियंता वर्ग-१ राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण उपविभाग माजलगाव, ६) प्रकल्प संचालक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण पीआययु औरंगाबाद, ७) मुख्य अभियंता आणि प्रादेशिक अधिकारी राष्ट्रीय महामार्ग नवी मुंबई, ८) मुख्य वन संरक्षक नागपूर, ९) उप मुख्यअभियंता (बांधकाम) मध्य रेल्वे अहमदनगर सदरील याचिकेचे सुनावणी दिनांक ०२/०५/ २०२४ रोजी ठेवण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने अँड.नरसिंह जाधव यांनी काम पाहिले तर त्यांना अँड.राकेश ब्राम्हणकर यांनी सहकार्य केले.

## समर्थ कोचिंग क्लासेसचे घवघवीत यश,गुणवंत विद्यार्थ्यांत्यांना बक्षीस देऊन सत्कार सोहळा संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क
सुनिल बस्वराज हावा । उदगीर

शहरातील समर्थ कोचिंग क्लासेस चे संचालक नागनाथ गुट्टे यांच्या शिकवणी क्लासेसचे हे नवे वर्ष दर वर्षी प्रमाणे या ही वर्षामध्ये इयत्ता पहिली ते आठवी या विद्यार्थ्यांची प्रथम सत्र व द्वितीय सत्र परीक्षा घेण्यात आले होती या परीक्षेमध्ये वर्ग पहिली ते आठवीपर्यंत प्रथम व द्वितीय क्रमांक काढण्यात आला होता प्रथम व द्वितीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना क्लासेस च्या वतीने बक्षीस वितरणाचे आयोजन करण्यात आले होते .या बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाचे अध्यक्ष दिलीप हाणमंते तर प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रकांत जाधव,संपादक सुनिल हावा ,संपादक भिबिषण मद्देवाड व रामेश्वर बिरादार यां मान्यवरांचे शाल पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले व मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.



कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच विद्येची देवता माता सरस्वती यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवंदन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना चंद्रकांत जाधव, दिलीप हणमंते व प्रा. बिभीषण मद्देवाड यांनी सखोल असे मार्गदर्शन केले.

वर्ग पहिली प्रथम रुद्राक्ष बिरादार तर द्वितीय गुरुराज हुंजे ,दुसरी वर्गातील प्रथम दिपक चोले व द्वितीय माणीकराज अडगुळवार,तिसरीत प्रथम सोहम जाधव व द्वितीय ज्ञानेश्वर ढगे व अक्षता काळे ,चौथी इयत्तेत प्रथम योगेश्वरी वच्चे तर द्वितीय बजरंग बिरादार व तनुजा चोले पाचवी इयत्तेतील प्रथम आदिती गुट्टे तर द्वितीय सोहम कांबळे ,सहावी इयत्तेत प्रथम वेदांत केदार तर द्वितीय प्रभात फावडे सातवी इयत्तेत प्रथम स्वप्नाली बिरादार तर द्वितीय गणेश समगे, आठवी इयत्तेत प्रथम हर्षदा गुट्टे तर द्वितीय संस्कृती केंद्रे यांना बक्षीस देण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांबरोबर च पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार हर्षदा गुट्टे यांनी केले.

## बीड जिल्ह्यातील करेवाडीच्या दोन रोड रोमिओं पोलीसांच्या ताब्यात

लोकनेता न्यूज नेटवर्क
बीड । विजय रोडे

बीड जिल्ह्यातील करेवाडी येथील शाळेत जानाऱ्या येणाऱ्या मुलीला रस्त्यात गाठून छेड काढणाऱ्या परळी तालुकयातील करेवाडीच्या त्या दोन रोमिओंना सिरसाळा पोलीसांनी आज दिनांक ६ एप्रिल रोजी ताब्यात घेतले आहे.त्यांच्यावरती कलम ३५४,३४१ भादवी व पोस्को कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि घटना दिनांक १ एप्रिल रोजी घडल्याचे समजते



आहे. काल मनोज जरांगे पाटी यांनी नारायण गड येथे मराठा समाज बांधवांच्या झालेल्या बैठकीत सदरील छेडछाडीचा विषय व्यक्त केला होता .

परळी तालुक्यात माझ्या समाजाच्या मुलींना त्रास दिला जातो, अन्याय केला जातो असे म्हणत या प्रकरणी धंनजय मुंडे यांनी लक्ष द्यायला हवे अन्यथा आम्ही परळीत घुसू असे पाटिल यांनी वक्तव्य केल्या नंतर ह्या घटनेकडे शासन/प्रशासनाचे लक्ष वेधले गेले.

सिरसाळा पोलीस प्रशासनाने यातील रोमिओं दोन आरोपींना आज ताब्यात घेतले आहे. पुढील कार्यवाही सुरु असून अधिक तपास सह पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहिफळे हे करत आहेत.

## आळेफाटा पोलिसांची दमदार कामगिरी

### ५ लाख ३६ हजार किंमतीचा गांजा जप्त

लोकनेता न्यूज नेटवर्क
मयूर ढोबळे । जुन्नर

आळेफाटा(ता.जुन्नर)शिवारातील बोरी बु येथील ठाकरवाडीत टाकलेल्या छाप्यात विक्रेत्याला अटक करून ५ लाख ३६ हजार किंमतीचा गांजा जप्त करण्यात आला .

जुन्नर न्यायालयाने संशयित आरोपी सुरेश मनोहर केदारी यांना न्यायालयीन कोठडीत ठेवले असल्याचे पोलिस निरीक्षक सतीश होडगर यांनी सांगितले.

आळेफाटा पोलिस निरीक्षक सतीश होडगर यांना एक एप्रिल रोजी खबऱ्याकडून माहीती मिळाली असता बोरी बुद्रुक शिवारातील ठाकरवाडीत सुरेश मनोहर केदारी यांच्या घरात गांजा विक्री सुरू असल्याची माहिती




मिळाली.

पोलिस अधीक्षक डॉ पंकज देशमुख उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर,पोलिस निरीक्षक सतीश होडगर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील बडगुजर यांच्या नेतृत्वाखाली पोलिस पथकाने टाकलेल्या छाप्यात १७ किलो ८६५ ग्रॅम वजनाचा अंदाजे ५ लाख ३५ हजार ९५० रुपये किंमतीचा गांजा आढळून आला. आळेफाटा पोलिसांनी संशयित आरोपी सुरेश मनोहर केदारी(वय ३५ वर्षे,रा.बोरी बुद्रुक,ठाकरवाडी ता.जुन्नर) यांना अटक करून जुन्नर न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली.

## माजी मंत्री बबनराव घोलप शिंदेंच्या शिवसेनेत दाखल

लोकनेता न्यूज नेटवर्क
नाशिक (वृत्तसंस्था)

शिवसेना ठाकरे गटात नाराज असलेले माजी मंत्री बबनराव घोलप यांनी आज अखेर शिंदेच्या शिवसेनेत प्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. दोन महिन्यांपूर्वीच बबनराव घोलप यांनी उद्धव ठाकरेंकडे आपल्या पदाचा राजीनामा सोपवला होता. मात्र ठाकरेंकडून कुठलेही उत्तर न आल्याने त्यांनी आज अखेर शिंदे गटाची वाट निवडली. बबनराव घोलप यांच्यासह माजी आमदार संजय पवार यांनी देखील एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला.माजी मंत्री राहिलेले बबनराव घोलप उद्धव ठाकरे यांची साथ सोडणार आहे. मात्र त्यांचे पुत्र योगेश घोलप यांची भूमिका अद्याप गुलदस्त्यात आहे. ते एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाणार की उद्धव ठाकरे बरोबर राहणार? हे अद्याप स्पष्ट झाले नाही.

झाडे लावा
झाडे जगवा

### चारोळी

गेल्या क्षणाचे दुःख
उगाच का करीत बसावे
अवघड वाटेवरही
चेहऱ्यावरती हास्य दिसावे.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# श्री हिंगुलांबिका देवीचा इतिहास पुण्यस्मरण दिन विशेष

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोड**

श्री हिंगुलांबिका देवीचे मूळ स्थान आदिशक्ती कूण ५१ शक्तीपीठे आहेत. त्यातील पहिले शक्तीपीठ हे हिंगुला देवीचे होय. भारत व पाकिस्तानातील हिंदू-मुस्लिमांचे श्रद्धास्थान असलेले हे शक्तीपीठ पाकिस्तानात असून कराचीपासून वायव्येस २२५-२५० कि.मी. अंतरावर लासबेला संस्थानात हिंगोल नदीच्या किनार्यावर आहे. हे स्थान सिंधू नदीच्या मुखापासून १२२ कि.मी. पश्चिमेस बलुचिस्तान प्रांतात व अरबी समुद्रापासून उत्तरेस १८ ते २० कि.मी. अंतरावर आहे. नालंदा हिंदी शब्रकोशातही या देवीचा उल्लेख आहे तो असा हिंगुला, हिग्गुला, हिंगलाजा, हिंगुलाजा, दुर्गा या देवी की एक मूर्ती जो सिंध और बलुचिस्तान के बीच की पहाडियों में है।

हिंगुलांबिका नावाची उत्पत्ती

भगवान शंकराची पत्नी सती ही प्रजापती दक्ष राजाची मुलगी होती. प्रजापती दक्ष राजाने केलेल्या यज्ञात आपल्या न बोलवता आलेल्या मुलीचा व शंकराचा अपमान करून तो पार्वतीस यज्ञमंडपातून बाहेर काढतो. अपमानाने क्रोधित झालेल्या पार्वतीने त्या यज्ञातच स्वत:स जाळून घेते. त्यामुळे दक्षराजावर क्रोधित झालेल्या भगवान शंकराने ते पार्वतीचे शव घेऊन आसमंतात संचार करताना त्या शवाचे ५१ तुकडे होऊन वेगवेगळ्या ठिकाणी पडले. ज्या ज्या ठिकाणी ते तुकडे पडले ते सर्व शक्तीपीठे बनली. बलुचिस्तानातील डोंगरावर शिवपत्नीचे/ पार्वतीचे ब्रम्हरंध्र ( स्त्रिया आपल्या सौभाग्याचे कुंकू, सिंदूर लावतात तो भाग ) पडले. सतीच्या मस्तकावर/ ब्रम्हरंध्रावर कुंकू, सिंदूर असल्याने आणि कुंकूस संस्कृतमध्ये हिंगुल असे म्हणतात. म्हणून या भागास हिंगोल, हिंगुल, हिंगुलु असे म्हणतात. व अग्निपुराणातील अध्याय १२ नुसार व भागवत पुराणातील अध्याय ३ नुसार शिवपत्नी पार्वती/ दक्षराजाची कन्या सती हीच अंबिका आहे. अशा प्रकारे हिंगुल+अंबिका या शब्दाच्या एकत्रीकरणातून हिंगुलांबिका या शब्दाची उत्पत्ती झाली.

भक्ताच्या हाकेला धावणारी

सध्या हे ठिकाण पाकिस्तानात असून हिंदू धर्म ग्रंथ आणि संतांच्या कथेनुसार येथे विष्णूचे अवतार परशुरामांचे वडील जमदग्नि यांनी घोर तपस्या केली होती. भगवान परशुरामाच्या २१ वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय करण्याच्या प्रतिज्ञेमुळे अनेक क्षत्रिय हिंगलाज देवीच्या आश्रयाला गेले. देवीने त्यांना ब्रम्हक्षत्रियत्व देऊन त्यांचे रक्षण केले. अनेक क्षत्रिय या देवीच्या आश्रयाने आपला व्यवसाय बदलून राहत होते. वेगवेगळे व्यवसाय करून जगत होते. ज्या देवीच्या आशीर्वादाने ते क्षत्रिय जिवंत राहीले ती देवी त्यांची कुलदेवता बनली.

ब्रम्हवैवर्त्यपुराणानुसार बलुचिस्तानातील हिंगलाजमातेचे दर्शन केल्यास त्याला पूर्वजन्माच्या कर्माचे दंड मिळत नाही. प्रभू रामचंद्रसुद्धा रावणाचा वध केल्यानंतर ब्राम्हण हत्येपासून मुक्ती मिळविण्यासाठी देवीच्या दर्शनासाठी आले होते. व त्यांनी एक यज्ञही केला होता. त्याचबरोबर आध्यात्मिक संत गुरु नानक, दादा मखान, गोरखनाथ व भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी

शैलेश प्रेमनाथ वैजवाडे
सचिव:-भावसार युवा से.संस्था,परळी वै.
सदस्य-IBKM युवा परिषद महाराष्ट्र राज्य..
मो.९६५७२७१६९२



यांनीसुद्धा हिंगलाजमातेचे दर्शन घेतले होते. जेव्हा भारत व पाकिस्तानची फाळणी झाली तेव्हा या मंदिराचा उपयोग रिफ्युजी कॅम्पसारखा केला गेला होता. अनेक आश्रय व आधार नसलेल्या लोकांना हिंगलाज मातेने



मायेचं छत्र तर दिलेच त्याचबरोबर त्यांच्या प्राणाचे रक्षणही केले.

पाकिस्तानातील वैष्णवदेवी

हिंगलाजमातेची प्रवास यात्रा अमरनाथच्या वैष्णवदेवीहुन कठिण समजली जाते. वैष्णवदेवीप्रमाणेच मातेचा निवास पर्वतीय गुहेत आहे. हजार फुटांचे उंच-उंच पर्वत, लांब-लांब पसरलेले निर्मनुष्य वाळवंट, जंगलातील जंगली श्वापदे, तीनशे फुट उंच ज्वालामुखी व पाकिस्तानातील दहशतवाद त्यामुळे ही यात्रा करणे हे एक चित्तथरारक अनुभव समजला जातो. हाच चित्तथरारक अनुभव तेलगू चित्रपट निर्माते चंद्रशेखर येलेटी यांनी आपल्या साहसम या चित्रपटात दाखविला आहे. हा चित्रपट हीट ठरल्यामुळे नंतर तो तमीळ व हिंदीत द रियल जॅकपॉट या नावाने प्रदर्शित करण्यात आला. गोपीचंद, तापसी पन्नू, शक्ती कपूर अभिनीत या चित्रपटाचे संपूर्ण चित्रीकरण लडाखमध्ये झाले असून चित्रपटामध्ये अभिनेत्याचा भारत ते पाकिस्तानातील हिंगलाजमाता मंदिरातील खजिन्यापर्यंतचा चित्तथरारक प्रवास हाच चित्रपटाचा मुख्य गाभा आहे. अश्या या खजिन्याच्या लालसेपोटीच अनेक परकिय आक्रमकांनीदेखील या मंदिराला लक्ष्य केल्याचे दिसून येते. चीनी बौद्ध भिक्षुच्या मतानुसार भारतावर आक्रमण करणारा प्रथम मुस्लिम शासक मुहमद बिन कासिम व भारतावर १७ स्वार्या करणारा गजनीचा महमद यांनी हिंगलाज देवीचे मंदिर लुटण्याचा प्रयत्न केला होता. त्याचबरोबर दहशतवादी व कट्टरपंथीयांनीसुद्धा अनेक वेळा मंदिर लुटण्याचा प्रयत्न केला. परंतु स्थानिक हिंदू व मुस्लिमांनी या मंदिराचे रक्षण केले. पाकिस्तानी मुस्लिमांमध्येही देवीचा मोठा भक्त वर्ग आहे. भारताप्रमाणेच येथे दसर्यामध्ये नवरात्र हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. या काळात ३-३ किलोमीटर पर्यंत यात्रेची गर्दी असते. हे चित्र पाहून आपण पाकिस्तानात नसून भारतात असल्याचा भास होतो. मंदिरातील पुजारी गोपालगिरी महाराज यांच्या मतानुसार नवरात्र काळात १० ते २५ हजार भाविक देवीच्या दर्शनाकरिता मंदिराला भेट देतात. भारत, पाकिस्तान, बांग्लादेश, अमेरिका, ब्रिटन, इजिप्त, इराण इत्यादी देशातील लोकांचा यात्रेमध्ये समावेश असतो. हे पाकिस्तानातील प्रसिद्ध धार्मिक पर्यटनस्थळ असून बलुचिस्तानमधील अवामी पार्टी चे सिनेटर दानेश पलानी यांनी २७ जानेवारी २०२३ रोजी पाकिस्तानातील सिनेटमध्ये भाषणात म्हटले आहे की, बलुचिस्तानमधील हिंगलाजमाता मंदिर धार्मिक दृष्टीने अधिक महत्वाचे आहे. या देवीच्या भक्तांमध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीसुद्धा आहेत. असे सांगून पाकिस्तानी सांसदांना प्रश्न विचारला होता की, बलुचिस्तानातील लासबेला जिल्ह्यातील हिंगोल नदी किनारी हिंगलाजमातेचे ५००० वर्ष प्राचीन मंदिर आहे. करतारपूर कोरिडोरप्रमाणे या मंदिराचा धार्मिक पर्यटनस्थळ म्हणून विकास करण्याची सरकारची योजना आहे काय? असे केल्यास तेथील लोकांचे जीवनमानच बदलून जाईल. व पाकिस्तानच्या आर्थिक विकासाला हातभार लागेलअसे मत मांडले आहे. यावरून इस्लामिक पाकिस्तानमध्ये हिंदू मंदिराचे ( हिंगलाजमाता ) काय महत्व आहे? हे लक्ष्यात येईल. पाकिस्तानातील अनेक मुस्लिमही देवीची यात्रा करतात. देवीचे दर्शन घेणार्या महिलेस पाकिस्तानमध्ये हाजियानी म्हटले जाते. त्यांना धार्मिक ठिकाणी सन्मानाने पाहिले जाते. सुफी संत शहा अब्दुल लतीफ बिटाई यांनी देवीची यात्रा केली होती. त्यांनी आपल्या उर्दू कवितेमध्ये देवी त्यांच्या समोर प्रकट झाल्याचे वर्णन केले आहे. त्यांनीच या यात्रेचे वर्णन नानी माँ की हज यात्रा असे केले आहे. तेव्हापासून हिंगलाजमाता पाकिस्तानात नानी माँ याच नावाने प्रसिद्ध आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे आपणास युटच्यूबवर बलुचिस्तानातील हिंगलाजमातेचे दर्शन घरबसल्या घेता येते.

परळी वै भावसार समाज

आपल्या भारताची छोटी प्रतिकृती आपल्याला परळीच्या रूपाने पहावयास मिळते. भारताप्रमाणेच अनेक जात, धर्म, पंथ व भाषा बोलणारे लोक परळी वै. कित्येक वर्षापासून गुण्यागोविंदाने राहतात. त्याचप्रमाणे भावसार क्षत्रिय समाजही संघटीतपणे राहात असल्याचे दिसून येते. तसेच या शहराच्या औद्योगिक जडणघडणीतही भावसार क्षत्रिय समाजाचा सिंहाचा वाटा आहे. या समाजास धार्मिक दृष्टीने एकत्र ठेवण्याचे कार्य शंकर पार्वती नगर येथील श्री हिंगुलांबिका देवीच्या कृपेने होत आहे. श्री हिंगुलांबिका देवी ही भावसार क्षत्रिय समाजाची कुलदैवत आहे. दरवर्षी हिंगुलांबिका देवीचा प्रकटदिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो यावर्षी ०७ एप्रिल २०२४ रविवार रोजी देवीचा प्रगट दिन साजरा केला जाणार आहे.

ओम हिंगुले परम हिंगुले, अमृत-रुपिणि ।
तनु शक्ति मन: शिवे, ओम हिंगुल्यै नम:।।

# पी.टी.ए.एमच्या उदगीर (गी.) तालुका अध्यपदी प्रा.प्रदीपजी वीरकपाळे तर सचिवपदी प्रा.सिद्राम शेटकार यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सुनिल बस्वराज हावा । उदगीर**

उदगीर येथील खाजगी कोचिंग क्लासेस (गी.) च्या संचालकांची बैठक शुक्रवार दि. ०५/०४/२०२४ रोजी समर्पण करिअर इन्स्टिट्युट येथे संपन्न होऊन या बैठकीत सर्वानुमते व अतिशय प्रसन्न वातावरणात संघटनेच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असलेले कोरोना सारख्या महामारी मध्ये अन्नधान्य किट वाटप करुन जनसामान्यांना माणसीक आधार देणारे तथा अनेकांचे अभिष्टचिंतन सोहळे साजरे करून आनंद द्विगुणित करणारे तसेच गरीब होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देऊन मनोधैर्य वाढविणारे तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित असलेले, शैक्षणिक क्षेत्रात उदगीर पॅटर्न मध्ये एक आगळा-वेगळा ठसा उमटवलेले व सिंहांचा वाटा असणारे व मागच्या २४ वर्षापासून अनेक डॉक्टर व हजारो इंजिनिअर घडवणारी फॅक्टरी तसेच विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून ज्यांचे नाव लौकीक आहे



असे ज्ञानवंत शिस्तप्रिय प्रा. प्रदीपजी वीरकपाळे सर यांची निवड करण्यात आली.

याशिवाय या संघटनेच्या सचिवपदी प्रा. सिद्रामजी शेटकार, उपाध्यक्षपदी प्रा. निलेशजी मंगळूरे व प्रा. गणेशजी बेद्रे, कोषध्यक्षपदी प्रा. अविनाशजी पाटील, कार्याध्यक्षपदी प्रा. सचिनजी शेळके, प्रमुख सल्लागार प्रा. परमानंदजी नागुरे, प्रमुख मार्गदर्शक प्रा. परमेश्वरजी जयस्वाल, सहसचिव प्रा. श्रीकृष्णाजी वाडकर, सह कार्याध्यक्ष प्रा. साईनाथजी काटेवाड, प्रमुख प्रवक्ता प्रा. अशरफजी खान, मीडिया प्रमुख प्रा. सुनिलजी ढगे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या बैठकीला प्रा. परमानंद नागूरे, प्रा. परमेश्वर जयस्वाल, प्रा. युसुफ मुंजेवार, प्रा. प्रदीप वीरकपाळे, प्रा. सिद्राम शेटकार, प्रा. सचिन शेळके, प्रा. निलेश मंगळूरे, प्रा. अविनाश पाटील, प्रा. सुनील ढगे, प्रा. श्रीकृष्ण वाडकर, प्रा. रूकमाजी कदम, प्रा. परमेश्वर वाडकर, प्रा. सौ. पल्लवी कुलकर्णी, प्रा. अशरफ खान, प्रा. गणेश बेद्रे, प्रा. राधाकृष्ण जाधव, प्रा. पवन नलाबले, प्रा. संतोष पांडे, प्रा. साईनाथ काटेवाड, प्रा. सुनील विरकपाळे, प्रा. राजेश जाधव, प्रा. विजय पाटील, प्रा. राहुल बिरादार, प्रा. मनोज नरवाडे, प्रा. केशव बिरादार इत्यादी विविध क्लासेसचे तज्ञ संचालक उपस्थित होते.ही निवड पुढील पाच वर्षासाठी करण्यात आली आहे. या निवडीबद्दल अध्यक्ष प्रा. प्रदीपजी वीरकपाळे सर व नूतन सर्व पदाधिकाऱ्यांचा सर्व क्लासेस संचालकाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना प्रा. प्रदीपजी वीरकपाळे सर म्हणाले की उदगीर पिटीए चा पहिला सचिव मी होतो, माझ्या काळात मी सर्व क्लास संचालकांना त्यांचा अडचणी सोडवण्यासाठी खारीचा वाटा उचलला होता. आता पुन्हा झढ-च् उदगीर (गी.) संघटनेची जिम्मेदारी सर्वांनी माझ्यावर टाकलेली आहे, तरी क्लासेस संचालकांच्या या विश्वासाला तडा जाऊ न देता अतिशय सक्षमपने मी माझ्या सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने संघटना चालवेन व कोणत्याच क्लासेस संचालकाला कसलीच अडचण येणार नाही याची पुरेपूर काळजी घेईन असा विश्वास दिला.

या निवडीबद्दल अध्यक्ष प्रा. प्रदीपजी वीरकपाळे सर यांच्यासह सर्व नूतन पदाधिकाऱ्यांवर सर्व स्तरातून कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आ.सुरेश धस जिल्ह्यात आघाडीवर

# पंकजाताई पालकमंत्री असताना सर्वात जास्त निधी आणि विकास कामे-आ.सुरेश धस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजु म्हस्के**

सन २०१४-२०१९ या भारतीय जनता पार्टी,शिवसेना महायुतीच्या शासनामध्ये पंकजाताईसाहेब मुंडे या ग्रामविकास मंत्री आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री असताना स्वातंत्र्य मिळाल्यापासून सर्वात जास्त निधी बीड जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांनीच आणलेला आहे.मराठा आरक्षण प्रश्नामुळे समाज मन एकत्रित आलेले आहे आणि राज्य शासनाने दिलेले मराठा आरक्षण हे न्यायालयीन प्रक्रियेमध्ये टिकणारे असेल असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजितदादा पवार यांनी दिलेले असल्यामुळे.. सामाजिक भान राखून सर्व जबाबदार कार्यकर्त्यांनी गावातील प्रमुखांनी जनतेपर्यंत जाऊन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या कामाची माहिती द्यावी आणि आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार राष्ट्रीय सचिव पंकजाताई साहेब मुंडे यांना मोठ्या मताधिक्याने लोकसभेत पाठवावे असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले ..

बीड लोकसभा निवडणुकीतील भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रीय समाज पार्टी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या महायुतीच्या उमेदवार भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी धामणगाव जिल्हा परिषद गट व मुर्शदपुर गटातील प्रमुख पदाधिकारी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य,सेवा सोसायटीचे चेअरमन यांच्यासह प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीमध्ये मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले.. पंकजाताई मुंडे या राज्याच्या ग्रामविकास मंत्री आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री असताना स्वातंत्र्यापासून सर्वात जास्त निधी त्यांनी बीड जिल्ह्यासाठी दिला असून वाड्यावर, वसत्यांवर,तांड्यापर्यंत च्या ठिकाणी पक्के रस्ते तसेच पिण्याच्या पाण्याची सोय केलेली आहे.तसेच अहमदनगर बीड रेल्वे मार्गासाठी राज्य आणि केंद्र शासनाचा निधी त्यांच्यामुळेच मिळालेला असून अहमदनगर ते अमळनेर पर्यंत रेल्वे धावली आहे तसेच केंद्र शासनाच्या माध्यमातून अनेक राष्ट्रीय महामार्ग, राज्यमार्ग, ग्रामीण मार्ग, ग्राम विकास विभाग अंतर्गत ग्रामीण मार्ग मोठ्या प्रमाणावर पूर्ण झालेले आहेत असे सांगत.. सद्यस्थितीमध्ये मराठा आरक्षणामुळे समाजामध्ये अनेक शंका कुशंका व्यक्त केल्या जात आहेत. देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनीच मराठा समाजाला आरक्षण दिले होते परंतु त्यानंतर सत्ता बदल होऊन सत्तेवर आलेल्या महाविकास आघाडीच्या काळामध्ये या प्रश्नाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे हे आरक्षण न्यायालयीन प्रक्रियेत टिकले नाही. मात्र सध्याच्या राज्य शासनाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रोटोकॉल बाजूला ठेवून मराठा समाजाच्या भावना समजून घेतल्या आणि मराठा समाजाला शैक्षणिक



आणि सामाजिक १० टक्के आरक्षण मंजूर केले आहे तसेच सगे सोयऱ्यांच्या बाबतही हे सरकार सकारात्मक असून हरकतीच्या पडताळणी नंतर त्या बाबतीत निर्णय होणार आहे.. मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी सकारात्मक रीतीने मागासवर्गीय आयोगाकडे माहिती सादर केलेली आहे त्यामुळे हे मराठा आरक्षण टिकणारे आहे असा विश्वास सर्वांनाच वाटत आहे असे असताना मात्र मराठा समाजाच्या मूक मोर्चांना मुका मोर्चा अशी टिंगल महाविकास आघाडीतील काही नेते करत होते.ज्या नेतृत्वाने मराठा समाजाला खऱ्या अर्थाने आरक्षण दिले आणि त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला अशा माणसाची जात काढून त्याला बदनाम करण्याचा काही प्रवृत्ती प्रयत्न करत आहेत हे अत्यंत दुर्दैवी आहे. इतर मागासवर्गीय समाजाच्या सर्व सवलती या आरक्षणामुळे मिळत असून या शासनाने शैक्षणिक धोरणामध्ये देखील बदल करून शैक्षणिक वर्षात राज्यातील सर्व समाजातील मुलींची शैक्षणिक फीस राज्य शासन भरणार आहे..आपल्या जवळच्या कार्यकर्त्यांनी या सर्व बाबी समाजामध्ये जाऊन समजावून सांगण्याची आवश्यकता आहे.आपले राजकीय विरोधक समाजामध्ये सामाजिक दुहेरी पसरवण्याचे काम करत असून चुकीचे बोलत असतील.. सामाजिक समतोल बिघडवण्याचे काम करत असतील. तर त्यांना गावोगावातील प्रमुख मंडळींनी जागेवर चोख उत्तर द्यावे. आपण सर्वजण दररोज जनतेच्या सुखा दुखात सहभागी आहोत त्यामुळे जो कार्यकर्ता दररोज सुख दुःखात सहभागी असतो त्याचेच मतदार ऐकत असतात.ज्या राजकीय पक्षाने मराठा समाजाला सत्ता असताना आरक्षणासाठी विरोध केला. त्या लोकांना आता मराठा आरक्षणाचा पुळका आलेला असला तरी मतदार राजा सुज्ञ आहे त्यांना सर्व इतिहास ठाऊक आहे.त्यामुळे सर्व प्रमुख कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीच्या आणि मित्र पक्षांच्या महायुतीच्या उमेदवार भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय सचिव पंकजाताई साहेब मुंडे यांना मोठ्या मताधिक्याने लोकसभेत पाठवण्यासाठी प्रयत्नांची परकाष्टा करावी असे आवाहनही त्यांनी शेवटी केले..यावेळी धामणगाव येथे माजी सभापती छत्रगुण मरकड,संजय गाढवे, विस्तारक हरिष खाडे, माजी सरपंच अशोक गर्जे, एन.टी.गर्जे, डॉ.युवराज तरटे, सरपंच नंदकिशोर करांडे, शहादेव वणवे,संपत ढोबळे, धनंजय तरटे,कल्याण काकडे, सरपंच मनोज गाढवे, सुंदरलाल गर्जे तर आष्टी येथील बैठकीस युवानेते जयदत्त धस, आदिनाथ सानप,अरुण भैय्या निकाळजे, विस्तारक हरिष खाडे,गणेश शिंदे,रंगनाथ धोंडे,आत्माराम फुंदे,खंडू दादा जाधव,सरपंच सुधीर पठाडे,सरपंच अशोक मुळे,शांतीलाल भोसले,दीपक निकाळजे,अशोक पवार, किशोर झरेकर,शैलेश सहस्त्रबुद्धे,सुनील रेडेकर,बन्सी पोकळे,भारत मुरकुटे,सरपंच तात्यासाहेब शिंदे,संजय पोकळे, अमृत पोकळे,माजी सरपंच अतुल कोठुळे,सरपंच परिवंत गायकवाड,नवनाथ नागरगोजे, सरपंच हिराभाऊ केरुळकर, माजी सरपंच बबन शेकडे,भरत जाधव,नगरसेवक अक्षय धोंडे उपस्थित होते.

# गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सालगड्याच्या शोधात शेतकरी

## सालगडी लाखांत एक शोधूनही सापडेना ; सालगडी झाला लखपती ?

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार | धोंडीबा मुंडे**



भारत हा कृषी प्रदान देश असून कृषी संस्कृतीमध्ये गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर नवीन सालगडी ठेवण्याची परंपरा आहे.गुढीपाडवा जवळ आल्याने सालगड्याची शोधा-शोध सर्वत्र सुरू आहे.शेतकऱ्यांच्या नवीन वर्षास गुढीपाडव्यापासून सुरुवात होते. यंदा ९ एप्रिल रोजी गुढीपाडव्याच्या सण साजरा होणार असून,नववर्षारंभाला सालगडी मिळावा यासाठी शेतकऱ्यांकडून प्रत्येक गावात शोध घेतला जात आहे. परंतु अलीकडच्या काळात सालगडी मिळणे कठीण झाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. मागणीप्रमाणे सालाचे पैसे मोजूनही मनधरणी करावी लागत असल्याचे चित्र दिसत आहे. गुढीपाडव्याच्या एक महिना आधीपासूनच शेतकर्यांच्या शेतात राबणारे सालदार मालक पाडण्यापासून तुमची सोय करा बरं का... म्या पुढच्या वर्षी नोकरी करणार नाय.? असे सांगितले की शेतकर्यांच्या मात्र पाचावर धारण बसते.दिवसेंदिवस तोट्यात जाणारी शेती सांभाळायची कशी ? हा प्रश्न शेतकऱ्यांना पडलेला असतो. वाढती महागाई,उत्पादनाचा वाढता खर्च,दुष्काळग्रस्त परिस्थिती,निसर्गाची अवकृपा आणि शासनाचे शेतकरी विरोधी धोरण यामुळे शेतमालास योग्य भाव मिळत नाही.

चारा आणि पाण्याच्या आभावी पशुधनाची जोपासना करणे कठीण झाल्याने शेतकरी मेटा-कुटीला आला आहे, शेतकर्यांना गुढीपाडव्या पासून होणारी सालगड्याची मोठी डोकेदुखी ठरते की काय असेच चित्र निर्माण झाले आहे,सालगड्याचा वर्षाचा पगार आता एक लाखाच्या वर गेला आहे.त्यातच दुष्काळामुळे शेती परवडत नसल्याने सालगड्याचा पगार कसा परवडणार ? १ लाख रुपयेची बैलजोडी,सालगड्याचा पगार एक लाख, जमिन १० एकर शेती असणार्यास पेरणीपूर्व मशागतीपासून मळणीपर्यंत एकरी १२ हजार म्हणजे वर्षाकाठी ३ लाख २० हजार आणि बैलांचे पालन पोषणासाठी वर्षाला एक लाख रुपये अशा प्रकारे १० एकर शेतीवाल्या शेतकर्यांना ४ लाख २० हजार रुपये खर्चून शेतीत उत्पन्न मिळणार किती ? त्यात दुष्काळ, पिकावरील रोगराई, दुबार पेरणीचे संकट अशा अडचणींचा सामना करताना शेतकर्यांच्या नाकीनऊ येतात. दिवसेंदिवस बैलबारदाना व सालगडी ठेवून शेती परवडत नसल्याने ग्रामीण भागातील शेतकरी शेती विकून टाकणे, पैशावर तोडून देणे,हिश्यावर कसायला देणे किंवा यंत्राच्या सहाय्याने शेती करणे असा पर्याय शोधत आहेत.म्हणतात ना गरज ही शोधाची जननी आहे. त्याप्रमाणे शेतकरी गरजेनुसार नवे मार्ग शोधत असून सालगडी मिळत नाहीत,मिळाले तर आर्थिक दृष्टया परवडत नसल्याने बळीराजा सालगड्याच्या शोधात हैराण झाला आहे.

### सालाचे पैसेही द्या-अन् धान्यही

आजघडीला दीड लाखाच्या जवळपास मोबदला द्यावा लागत आहे.पण शेत मालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे बळीराज्याचे आर्थिक नियोजन कोलमडले आहे.सालगड्यासाठी दीडलाखाच्यापुढे रक्कम मोजली तरी कोणीही धजावत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना सालगडी मिळणे अवघड होऊन बसले आहे. मागील दोन ते तीन दशकांपासून सालगडी राहण्याचे प्रमाण हळूहळू कमी होत आहे.

### सालाने नको; महिन्याने काम हवे

विभक्त कुटुंब पद्धतीमुळे शेतीचे तुकडे,शेतीचे यांत्रिकीकरण खूप वाढले आहे.शेती-शिवाय इतर ठिकाणी मिळणारे काम, शेतीच्या तुलनेत मजुरीचे वाढते दर आणि शेतीतील कामांत गुत्ते आदी यातून मिळणारी जास्त मजुरी यामुळे वर्षभर एकाच शेतकऱ्याकडे ठरावीक रकमेत सालगडी म्हणून अडकून पडणे हे अनेकांना पटेनासे झाले आहे. महिन्याने किंवा रोजंदारीने कामाला येण्याची तयारी दाखविली जात आहे.त्यामुळे सालगडी मिळणे कठीण झाले आहे.

### परजिल्ह्यातील सालगड्याचा शोध

सध्याच्या घडीला सालगडी शोधूनही परिसरात सापडत नसल्यामुळे शेतकऱ्यांकडून गावात किंवा परगावातील सालगडी पाहिला जातो. तर काही शेतकरी शेजारी नांदेड व इतर दुसऱ्या जिल्ह्यातून सालगडी आणण्याचे नियोजन करीत आहेत. काही वर्षापूर्वी स्वतःहून सालगडी घरी यायचे व कामासाठी ठेवा म्हणून विनवणी करायचे.जे नियमित काम करायचे तेच वर्षानुवर्षे सालगडी म्हणून राहायचे. आता मात्र सालगडी म्हणून कुणी काम करायला तयार नसल्याचे चित्र सर्वत्र पाहावयास मिळत आहे.

# हिंगोली लोकसभा मतदार संघातील वैध उमेदवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली | सय्यद रहीम रजा**

हिंगोली लोकसभा मतदार संघात ५५ उमेदवारांनी एकूण ७८ नामनिर्देशन अर्ज दाखल केले होते. त्यापैकी शुक्रवारी (दि.०५) छाननीअंती ५५ उमेदवारांपैकी ७ जणांचे नामनिर्देशन अर्ज विविध कारणांमुळे अवैध ठरले आहेत. त्यामुळे या मतदारसंघात आजघडीला ४८ उमेदवार वैध ठरले आहेत. येत्या सोमवारी (दि.०८) उमेदवारी मागे घेण्याची शेवटची तारीख असून, या दिवशी मतदारसंघातील चित्र स्पष्ट होणार आहे.

यावेळी अपर जिल्हाधिकारी खुशाल सिंह परदेशी, निवासी उपजिल्हाधिकारी दिलीप कच्छवे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे यांच्यासह याकामी नियुक्त अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

हिंगोली लोकसभा निवडणुकीच्या नामनिर्देशन प्रक्रियेला गुरुवार, दि. २८ मार्चपासून सुरुवात झाली होती. या मतदार संघासाठी २६ एप्रिल रोजी दुसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे. नामनिर्देशनपत्र वितरण व स्विकृतीच्या शेवटच्या दिवसांपर्यंत ५५ उमेदवारांनी नामनिर्देशन अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ७ उमेदवारांचे अर्ज छाननीअंती अवैध ठरले आहेत. नामदनिर्देशन अर्ज वैध ठरल्यामुळे खालील उमेदवार सध्या निवडणूक रिंगणात आहेत.

१५-हिंगोली लोकसभा मतदारसंघातील वैध ठरलेल्या उमेदवारांची यादी

१.श्री. संभाराव ऊर्फ बाबुराव गुणाजीराव कदम-शिवसेना
२.श्री.गजानन धोंडबा डाळ-बहुजन समाज पार्टी
३.श्री.विजय रामजी गाभणे-कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्किस्ट)
४.श्री. रवी रामदास जाधव-अभिनव भारत जनसेवा पक्ष
५.श्री. देशा श्याम बंजारा-सामनाक जनता पार्टी
६.श्री. आष्टीकर पाटील नागेश बापुराव-शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)
७.श्री. अनिल देवराव मोहिते-अखिल भारतीय परिवार पार्टी
८.श्री.अल्ताफ अहेमद-इंडियन नॅशनल लिग
९.श्री. हेमंत राधाकिशन कनाके-राष्ट्रीय किसान बहुजन पार्टी
१०.श्री. गंगाधर रामराव सावत-इंडियन नॅशनल लिग
११.श्रीमती त्रिशला कांबळे-बहुजन समाज पार्टी (आंबेडकर)
१२.श्री. प्रकाश मेशराम रणवीर-रिपब्लिक पार्टी ऑफ इंडिया (ए)
१३.श्री. बाबू धनु चव्हाण-वंचित बहुजन आघाडी
१४.श्री. सुनील दशरथ इंगोले-भीम सेना
१५.श्रीमती देवसरकर वर्षा शिवाजी बहुजन मुक्ती पार्टी
१६.श्री. नामदेव ग्यानोजी कल्याणकर -अपक्ष
१७.श्री. वसंत किसन पाईकराव-अपक्ष
१८.श्री. रवी यशवंतराव शिंदे-अपक्ष
१९.श्री. मनोज आनंदराव देशमुख अपक्ष
२०.श्री बाजीराव बाबुराव सवंडकर अपक्ष
२१.श्री. अशोक वामन पाईकराव अपक्ष
२२.श्री. संजय श्रावण राठोड अपक्ष
२३.श्री. अशोक पांडूरंग राठोड अपक्ष
२४.श्री. राजू शेषराव वानखेडे अपक्ष
२५.श्री. आनंद राजाराम धुळे अपक्ष
२६.श्री. रामदास शिवराज पाटील-अपक्ष
२७श्री.अब्दुल कदीर मस्तान सयद (गोरेगावकर)-अपक्ष
२८श्री.विश्वनाथ भाऊराव फालेगावकर-अपक्ष
२९.श्री. शिवाजी मुंजाजीराव जाधव - अपक्ष
३०.श्री. रामप्रसाद नारायण बांगर-अपक्ष
३१.श्री. धनेश्वर गुरु आनंद भारती-अपक्ष
३२.श्री.विवेक भैय्यासाहेब देशमुख-अपक्ष
३३.श्री. रामराव आत्माराव जुंबडे-अपक्ष
३४.श्री.सर्जेराव निवृत्ती खंदारे-अपक्ष
३५.श्री. गोविंदराव फुलाजी भवर-अपक्ष
३६.ॲड विजय ज्ञानोबा राऊत-अपक्ष
३७.श्री.दत्ता श्रीकृष्णा सुर्यवंशी-अपक्ष
३८.श्री. देवजी गंगाराम असोले-अपक्ष
३९.श्री. अशोक संभाजी ढोले-अपक्ष
४०.श्री. गोविंद पांडूरंग वाव्हळ-अपक्ष.
४१.श्री.बाबुराव आनंदराव कदम-अपक्ष
४२.श्री. सुनील मोतीराम गजभार-अपक्ष
४३.श्री.महेश कैलास नप्ते-अपक्ष
४४.श्री. प्रो. डॉ. अश्विनकुमार पुरभाजी क्षीरसागर पाटील कोळीकर उर्फ (प्रा. के. सागर)-अपक्ष
४५.श्री.नागोराव पुंजाराम ढोले-अपक्ष
४६.श्री.अंबादास सुकाजी गाडे-अपक्ष
४७.श्री.दिवाकर माणिकराव माने-अपक्ष
४८.श्री.सत्तार पठाण-अपक्ष

# सरस्वतीनगर भीम जयंती मंडळ अध्यक्षपदी चंद्रकांत वाघमारे व उपाध्यक्षपदी अरुण मदणुरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद | साहेबराव दुगाने**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती १४ एप्रिल रोजी आहे. या अनुषंघाने धर्माबाद शहरातील सरस्वती नगर येथिल भीम अनुयायांनी एक बैठक घेऊन जयंती मंडळाची सर्वानुमते निवड केली आहे. अध्यक्ष पदी चंद्रकांत तुकाराम वाघमारे तर उपाध्यक्ष म्हणूण अरुण मदनुरे,सचिव म्हणून किरण घाटे यांच्यासह अनेकांची निवड यावेळी करण्यात आली आहे.

प्रत्येक ठिकाणी भीम अनुयायी खूप उत्साही दिसून येत आहेत . १४ एप्रिल रोजी १३३ भीम जयंती साजरी करण्यासाठी धडाडीने पुढे येत आहेत धर्माबाद शहरातील वार्ड क्र.५ सरस्वतीनगर येथे सुद्धा डॉ बाबासाहेब आंबेडकरांची १३३ ही जयंती साजरी करण्यासाठी नवयुवक भीम जयंती मंडळाची बैठक घेऊन कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून ती कार्यकारिणी पुढील प्रमाणे आहे. अध्यक्षपदी चंद्रकांत तुकाराम वाघमारे, उपाध्यक्षपदी अरुण मदनुरे, सचिव किरण घाटे, कोषाध्यक्ष जितेंद्र देवकरे, सहसचिव श्रीनिवास कैवाडे , व सदस्य रजनीकांत घाटे, धम्मपाल कांबळे, सुनील अवधुते, रमेश भद्रे, शामराव सोनकांबळे, राजेश जाधव, शंकरराव सोनकांबळे, संजय भद्रे, राजू भद्रे, सुरेश गाडेकर, पिराजी गायकवाड, रामचंद्र सोनकांबळे, बळीराम कांबळे, माधव जमदाडे, जणू सूर्यवंशी,प्रकाश झुंजारे, राहुल वारघडे, अविनाश भद्रे, सिद्धोधन कांबळे, साईनाथ सोनकांबळे, विजय कांबळे अशी आहे. यावेळी समस्त सरस्वती नगर धर्माबाद येथील बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका उपस्थित होते.

### आपला पक्षाच आपला असतो, याची जाणीव खडसे यांना झाली असेल-संजय शिरसाट

मुंबई-केवळ आपला पक्षाचा आपला असतो, याची जाणीव एकनाथ खडसे यांना झाली असेल, त्यामुळे ते पुन्हा भारतीय जनता पक्षामध्ये येत असतील, अशा शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांनी एकनाथ खडसे यांच्या भाजप प्रवेशावर प्रतिक्रिया दिली आहे.

# परळी पोलिसाचे कोंबिग ऑपरेशन १८आरोपी ताब्यात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोड**

परळी शहर,संभाजीनगर व ग्रामीण पोलिस ठाण्याच्या वतिने शुक्रवारी (दि.५ एप्रिल) रात्री लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परळी तालुक्यात गस्त घालुन ठिकठिकाणी तपासणी करण्यात आली.यामध्ये विविध गुन्ह्यामध्ये फरार असलेल्या १८ आरोपींना ताब्यात घेण्याबरोबरच तीन तलवारी व हातभट्टी दारु अड्डयावर छापा टाकत गुन्हे दाखल केले.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परळी पोलिस क्शन मोडमध्ये असुन शुक्रवार दि.५ एप्रिल रोजी रात्री ११ ते पहाटे ४ या वेळेत परळी शहरासह तालुक्यात पोलिस उपाधिक्षक चोरमले,परळी शहर पोलिस ठाण्याचे पोनि.संजय लोहकरे,संभाजीनगर पोलिस ठाण्याचे पोनि उस्मान शेख,ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोनि मनिष पाटिल यांच्यासह २३ कर्मचारी व आरसीपी ची एक प्लॅटुन अशा फोजफाट्यासह संयुक्त कारवाई करण्यात आली.यात विविध गंभीर गुन्ह्यातील दोन वर्षांपासुन फरार असलेल्या १८ आरोपीसह टोकवाडी,फुलेनगर या भागातुन तीन तलवारी जप्त करण्यात आल्या.गंगासागर नगर भागात सुरु असलेल्या हातभट्टी अड्डयावर छापा टाकत २२०० रुपयांचे रसायन जप्त करत एकास अटक केली.परळी पोलिसांच्या या कोबिंग ऑपरेशनमुळे गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहे.

# परभणी लोकसभा मतदारसंघाचे तिनही निवडणूक निरीक्षक यांचा परतूर व घनसावंगी दौरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोड**



लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने परभणी लोकसभा मतदार संघात परतूर व घनसावंगी विधानसभा मतदार संघातील निवडणूक विषयक कामकाजाचा आढावा शुक्रवारी मुख्य निवडणूक निरीक्षक कृष्णकुमार निराला , निवडणूक निरीक्षक (पोलीस) डॉ. विष्णुकांत आणि निवडणूक निरीक्षक (खर्च) अनुराग चंद्रा यांनी घेतला.

घनसावंगी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या सभागृहात आयोजित या आढावा बैठकीस जिल्हाधिकारी डॉ .श्रीकृष्ण पांचाळ , जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार ,अतिरिक्त पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, , उपजिल्हाधिकारी (निवडणूक) शशिकांत हदगल, उपविभागीय अधिकारी मनिषा दांडगे, उपविभागीय अधिकारी दिपक पाटील आदींसह निवडणूकीशी संबंधित विविध कामकाजाचे नोडल अधिकारी उपस्थित होते.

तत्पूर्वी येताना निवडणूक निरीक्षक यांनी आष्टी, ता परतूर येथील स्थिर पथकास भेट दिली.

सदर दौ-यादरम्यान मुख्य निवडणूक निरीक्षक कृष्णकुमार निराला व सर्व अधिकारी यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील स्ट्राँग रुमला भेट दिली. ज्या ठिकाणाहून मतदान पथके मतदान केंद्रावर रवाना होणार, त्या जागेची पाहणी केली . पोलींग पथके कसे रवाना होणार व जमा कसे होणार या बाबत सविस्तर आढावा घेतला . तसेच निवडणूक प्रक्रिया भयमुक्त व सुरळीत वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनाने सूक्ष्म नियोजन करावे. कर्मचा-यांना व्यवस्थित प्रशिक्षण द्यावे . निवडणूकीत सहभागी सर्व अधिकारी व कर्मचा-यांनी परस्पर समन्वय ठेवावा, याबाबत सूचना केल्या.

जिल्हाधिकारी जालना डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी झझढ द्वारे निवडणूक कामकाजाविषयक सादरीकरण केले . दोन्ही मतदार संघाबद्दल माहिती दिली. जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले की परतुर व घनसावंगी मध्ये निवडणूक विषयक नेमणूक करण्यात आलेले सेक्टर अधिकारी, नोडल अधिकारी व विविध कामकाजासाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना दोन ते तीन वेळा प्रशिक्षण दिलेले आहे. जिल्ह्यातील सर्व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणजे उपजिल्हाधिकारी यांचे वेळोवेळी प्रशिक्षण घेऊन त्यांचेमार्फत निवडणूक विषयक कामकाज व्यवस्थितरित्या सुरू आहे. मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी स्वीप ( sweep ) कार्यक्रमा अंतर्गत जिल्हाभरात विविध उपक्रम सुरू आहेत . ज्यामध्ये पालकांचे संकल्प पत्र भरून घेणे, व्हॅन द्वारे जनजागृती करणे इत्यादी बाबी मोठ्या प्रमाणात करण्यात आलेल्या आहेत.त्यानंतर पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांनी पोलीस विभागामार्फत करण्यात आलेल्या विविध प्रतिबंधात्मक कारवाया याबद्दलची माहिती दिली. तसेच निवडणूक निरीक्षकांना आश्वासित केले की जिल्हाधिकाऱ्यांच्या मदतीने कायदा व सुव्यवस्थेचा कोठेही भंग होणार नाही, याबाबत पुरेपूर दक्षता घेतली जाईल.

निवडणूक निरीक्षक (खर्च) अनुराग चंद्रा यांनी स्थिर पथक, व्हिडिओ टीम, लेखा समितीच्या कामकाजाचा आढावा घेतला. तसेच सूचित केले की, खर्चाचा हिशोब व्यवस्थितरीत्या ठेवावा. कोणत्याही उमेदवाराची एकही बैठक सोडू नका , सर्व ठिकाणचे खर्च बघा , त्याबद्दलच्या नोंदी ठेवा , अशा सूचना केल्या. निवडणूक निरीक्षक (पोलीस) डॉ . विष्णुकांत यांनी पोलीस विभागाकडून केलेल्या कारवायांची माहिती घेतली व सुचना केली की पुढील काळात येणारे दोन मुख्य सण म्हणजेच रमजान ईद व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखावी. निवडणूक प्रक्रिये दरम्यान असे संशयित व्यक्ती ज्यांच्याकडून निवडणूक प्रक्रियेस बाधा येऊ शकते, त्यांना ताब्यात घ्यावे. जेणे करुन निवडणुक प्रक्रीया सुरळीत पार पडेल .यानंतर मुख्य निरीक्षक कृष्णकुमार निराला यांनी विविध सूचना केल्या . त्यांनी सर्वांना आवाहन केले की मतदारांना जास्तीत जास्त आवाहन करून यावेळी ७५ टक्के मतदान होईल यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे . मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त मतदान केंद्र अधिकारी व इतर अधिकारी यांच्या प्रशिक्षणात कोणतीही कमतरता राहणार नाही, याबाबत दक्षता घेण्याबाबत सर्व अधिकाऱ्यांना सांगितलं.

सर्व मतदान केंद्रांवर सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध राहतील यासाठी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दक्षता घ्यावी. मतदान अधिकाऱ्यांना पिण्याचे पाणी , उत्तम जेवणाची व्यवस्था , लाईट, स्वच्छतागृह मिळेल याची दक्षता घ्यावी . मास्टर ट्रेनर यांनी मतदान अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देताना त्यांच्या मनात कोणतीही शंका राहणार नाही , याची दक्षता घ्यावी . अशा अनेक सुचना करुन मतदान सुरळीत पार पडेल याबाबत माझी खात्री आहे, आणि तुम्ही पार पाडाल असा विश्वास दर्शविला.सदरची बैठक व्यवस्थित रित्या पार पडावी यासाठी अपर जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी विशेष मार्गदर्शन केले , आमच्या शंकाचे निरसन केले, असे सहायक निवडणूक अधिकारी दीपक पाटील आणि मनीषा दांडगे यांनी नमूद केले . उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल हे नेहमीच ऑनलाईन बैठका घेऊन मार्गदर्शन करतात , तसेच निवडणूक आयोगामार्फत प्राप्त नवीन सूचना आमच्यापर्यंत पोहोच करतात, ज्यामुळे निवडणूक विषयक कामकाज अगदी उत्तम रीतीने सुरू असल्याबाबत घनसावंगीच्या तहसीलदार योगिता खटावकर यांनी नमूद केले . निवडणूक निरीक्षक यांचा दौरा यशस्वीरित्या पार पडावा यासाठी बैठकीची व्यवस्था करणे , सर्व अधिकारी , कर्मचारी यांचा आढावा घेणे, यासाठी अंबडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी विशेष परिश्रम घेतले.

दैनिक लोकनेता



# लोकसभा निवडणूक भयमुक्त आणि शांततेत पार पाडण्यासाठी सर्वांनी एकत्रित काम करा-निवडणूक निरीक्षक एम.एस.अर्चना

## निवडणूक निरीक्षक आर.जयंथी,कमलदीप सिंह यांनीही घेतला आढावा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार १५-हिंगोली लोकसभा मतदार संघातील सर्व यंत्रणा निवडणूक कामासाठी सज्ज झाली असून, हिंगोली मतदारसंघातील संपूर्ण यंत्रणेने चांगले नियोजन केले आहे. यापुढील काळातही निवडणूक भयमुक्त आणि शांततेत पार पाडण्यासाठी सर्वांनी एकत्रित काम करण्याचे निर्देश निवडणूक निरीक्षक (सामान्य) श्रीमती एम. एस. अर्चना यांनी आज येथे दिले.




जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समितीच्या सभागृहात आज सर्वसाधारण निवडणूक निरीक्षक श्रीमती एम. एस. अर्चना यांच्या अध्यक्षतेखाली मतदारसंघाच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस निवडणूक निरीक्षक आर. जयंथी, खर्च निवडणूक निरीक्षक कमलदीप सिंह, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर, पोलीस अधीक्षक जी. श्रीधर, मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, सहायक जिल्हाधिकारी श्रीमती कावली मेघना, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, निवासी उप जिल्हाधिकारी दिलीप कच्छवे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे, एनआयसीचे अब्दुल बारी, सर्व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह निवडणूक यंत्रणेतील सर्व विभाग प्रमुख यावेळी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी मतदारसंघाच्या निवडणूक तयारीचे सादरीकरण केले. याशिवाय जिल्हा पोलीस अधीक्षक जी. श्रीधर यांच्यासह विभाग प्रमुखांनी सादरीकरण केले.

गेल्या तीन दिवसांपासून लोकसभा मतदारसंघातील सर्व विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रांना भेटी देत तपासणी केल्याचे सांगून श्रीमती अर्चना म्हणाल्या की, येथील मतदान केंद्रांवर मतदारांना मतदानाच्या दिवशी सर्व आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात. यामध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृह, पुरेसा विद्युत पुरवठा, रॅम्प, दिव्यांगांसाठी व्हीलचेअर, त्यांना ने-आण करण्यासाठी वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देत प्रत्येक मतदान केंद्रावर मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जनजागृती करावी. तसेच मतदानाच्या दिवशी घरातील प्रत्येक मतदार मतदानासाठी केंद्रावर येईल, याकडे यंत्रणेने विशेष लक्ष देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

जिल्ह्यामध्ये कायदा व सुव्यवस्था परिस्थिती कठोरपणे हाताळा आणि कोणत्याही परिस्थितीत आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही, याची काळजी घेण्याचे त्यांनी निर्देश दिले. यासाठी पोलीस प्रशासन व स्थानिक प्रशासनाने निवडणूक काळात संवेदनशीलतेने समन्वय ठेवण्याचे आवाहनही त्यांनी केले.

पोलीस निवडणूक निरीक्षक आर. जयंथी यांनी यावेळी स्ट्राँग रूमच्या सुरक्षा व्यवस्थेपासून तपासणी पथकाच्या तत्परतेबाबत आढावा घेतला. सर्व वरिष्ठ अधिकारी निवडणुकीच्या काळात कार्यरत असून, सर्वांनी या काळात कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, याची सर्व त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात व योग्य समन्वय राखत काम करण्याची सूचना त्यांनी केली.निवडणूक निर्णय कक्ष, स्वीप, प्रशिक्षण व व्यवस्थापन, आचारसंहिता, कायदा व सुव्यवस्था, ईव्हीएम कक्ष, मतदान, मीडिया, माहिती व्यवस्थापन तक्रार निवारण कक्ष, सी-व्हीजील, वाहतूक व संपर्क व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था, तसेच हिंगोली लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा क्षेत्राच्या सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांना असलेल्या समस्यांबाबत त्यांनी माहिती जाणून घेतली. यावेळी कमलदीप सिंह यांनी उमरखेड, किनवट आणि हदगाव विधानसभा मतदारसंघातील नाक्याबाबत तिन्ही जिल्ह्यातील यंत्रणेने योग्य समन्वय राखून काम करावे, अशा सूचना केल्या.

# निवडणूक निरीक्षकांकडून लिंबाळा मक्ता येथील स्ट्रॉंगरूमची पाहणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**

भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चा कार्यक्रम घोषित केला असून, त्यानुसार हिंगोली लोकसभा मतदारासंघासाठी २६ एप्रिल रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. त्यामुळे आज निवडणूक निरीक्षक, जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस अधीक्षक यांच्यासह निवडणूक यंत्रणेकामी असलेल्या विभाग, पथकप्रमुखांनी लिंबाळा मक्ता येथील स्ट्रॉंगरुमची पाहणी केली.



यावेळी पोलीस निवडणूक निरीक्षक आर. जयंथी, खर्च निवडणूक निरीक्षक कमलदीप सिंह, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर, पोलीस अधीक्षक जी. श्रीधर, सहायक जिल्हाधिकारी श्रीमती कावली मेघना, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, निवासी उप जिल्हाधिकारी दिलीप कच्छवे, शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य पी. बी. देवसरकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे, सर्व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह निवडणूक यंत्रणेतील सर्व विभाग प्रमुख यावेळी उपस्थित होते.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने निवडणूक यंत्रणा सज्ज ठेवली आहे. या व्यवस्थेची पाहणी करण्यासाठी तीनही निवडणूक निरीक्षकांनी आज स्ट्रॉंग रुम, इव्हीएम साठवणूक कक्षाला भेट देऊन पाहणी केली. हिंगोली लोकसभा मतदारसंघाची निवडणूक २६ एप्रिल २०२४ रोजी होत आहे. यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज आहे. प्रत्येक विधानसभा क्षेत्रात निवडणुकीसंदर्भात चोख व्यवस्था करण्यात आली आहे. या अनुषंगाने त्यांनी येथील स्ट्रॉंग रुमची पाहणी करून आढावा घेतला.

निवडणूक निरीक्षक श्रीमती अर्चना यांनी निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे स्ट्रॉंगरूममध्ये सर्व व्यवस्था असल्याबाबत पाहणी करून खात्री केली. तसेच विद्युत शॉर्ट सर्कीटमुळे मतदानयंत्रांना हानी होऊ नये याची दक्षता घेण्यासाठी या कक्षातील व गॅलरीतील तसेच लगतच्या इतर कक्षातील विद्युत पुरवठा बंद करण्याच्या सूचना दिल्या. त्यांनी सीसीटीव्ही यंत्रणा, अग्निरोधक यंत्रणा, डबल-लॉक सिस्टीम व परिसरातील सुरक्षा यंत्रणेची पाहणी केली. स्ट्रॉंगरुम म्हणून निवड केलेला परिसर सुरक्षीत करण्याचे त्यांनी सांगितले. मतमोजणी केंद्रावर स्वच्छतेसह इतर सर्व आवश्यक सुविधेसोबतच उन्हापासून बचावासाठी शेड व पिण्याचे पाणी या दोन सुविधा प्रामुख्याने उपलब्ध ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

या लोकसभा मतदारसंघातील ८२- उमरखेड, ८३- किनवट, ८४- हदगाव, ९२- वसमत, ९३- कळमनुरी आणि ९४- हिंगोली या विधानसभा मतदार संघ निवडणुकीसाठी वापरण्यात आलेल्या ईव्हीएम व्हीव्हीपॅट आणि इतर साहित्य शासकीय तंत्र निकेतन, एम. आय. डी. सी. लिंबाळा मक्ता, येथील स्ट्रॉंग रूममध्ये सुरक्षित ठेवण्यासाठी आणण्यात येणार असून, या ठिकाणी ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे.मतमोजणी केद्रावरील स्ट्रॉंग रूम, मतमोजणी कक्ष, ईटीबीपीएस / टपाली मतपत्रिका मोजणी कक्ष, निवडणूक निरीक्षक यांचे कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कक्ष, टॅब्युलेशन कक्ष, मिडीया कक्ष, वाहन पार्किंग व्यवस्था तयार करणे व ईव्हीएम, व्हीव्हीपॅटची सुरक्षा व्यवस्था इथे करण्यात येणार असल्यामुळे याकामी असलेल्या यंत्रणेने सतर्क राहण्याचे निर्देश श्रीमती अर्चना यांनी दिले.

# राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ केज कार्यालयाचे उद्घाटन संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । अमोल सावंत**

दि .०६ एप्रील पुरोगामी पत्रकार संघ केज तालुका कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.केज पुरोगामी पत्रकार संघ कार्यकरीणि च्या वतीने उपस्थीत सर्व पत्रकार बांधव यांचे शब्द सुमनाने स्वागत पुरोगामी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष श्री.रंजीत घाडगे यांनी प्रस्तावना करताना केले.पत्रकारीता म्हणजे लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे ,पत्रकारांना बातमी कव्हर करण्यासाठी हक्काचे ठिकाण आवशयक असते त्यामुळे संघाच्या कार्यकारिणी मार्फत सुहाना हॉटेल च्या बाजुला कळंब रोड या ठिकाणी आफीस चे उद्घाटन केले.विशेषता यावेळी कार्यालयाच्या उद्घाटनाप्रसंगी पुरोगामी पत्रकार संघाचे नवनिर्वाचित पुरोगामी पत्रकार संघ मराठवाडा उपाध्यक्ष श्री .मुब्बशीर शेख व पुरोगामी पत्रकार संघ बीड जिल्हा अध्यक्ष श्री.दत्तात्रय मुजमुले यांचा सामुहीक सत्कार सर्व पत्रकार बांधवाच्या उपस्थीतीत करण्यात आला. सर्व पत्रकार बांधवानी शुभेच्छांचा वर्षाव केला.पुढील वाटचालीत जनसामान्यांच्या अडिआडचणी वर मात करण्यासाठी आपलि लेखनी अविरत चालु राहावी अशी अपेक्षा केली.मुब्बशीर शेख व दत्तात्रय मुजमुले यांनी आपले मनोगत व्यक्त केले.पत्रकार अनिल वैरागे यांनी सर्व पत्रकार बांधवाचे कार्यक्रमाला आवर्जुन उपस्थीत राहिल्याबद्दल अभार व्यक्त केले व कार्यक्रम संपला असे जाहीर केले.

# सावरगाव (मायंबा) येथे सोमवारी मच्छिंद्रनाथांचा समाधीस्नान सोहळा

## वर्षातून एकदाच समाधी उघडी करून घेतले जाते दर्शन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी। राजू म्हस्के**

आष्टी तालुक्यातील गर्भगिरीच्या पर्वतरांगेतील श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव (मायंबा) येथे नवनाथांपैकी एक असलेले मच्छिंद्रनाथांची संजीवनी समाधी असुन गुढी पाडव्याच्या फाल्गुनी अमावस्याच्या रात्री म्हणजेच दि.८ एप्रिल रोजी सोमवारी रोजी दर्शनासाठी खुली करण्यात येणार आहे. वर्षभरातून फक्त एकदाच फाल्गुनी अमावस्येला संजीवनी समाधीवर भाविकांना सुगंधी चंदनलेप,चंदन उटी लेप लावण्याचा कार्यक्रम असतो. भारताच्या कानाकोपऱ्यातुन आलेले लाखो नाथभक्त अंघोळ करत दर्शन घेतात.यावेळी मच्छिंद्रनाथ देवस्थान ट्रस्ट व प्रशासनाच्या वतीने भाविकांचे सुलभ दर्शनासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. नवनाथांपैकी आद्यनाथ समजल्या जाणार्या चैतन्य मच्छिंद्रनाथांची संजीवन समाधी तालुक्यातील श्रीक्षेत्र सावरगाव (मायंबा) येथे आहे. गर्भगिरी डोंगराच्या कुशीत वसलेल्या या गावाला मोठा अध्यात्मिक वारसा लाभलेला आहे. मच्छिंद्रनाथांनी येथे संजीवन समाधी घेतलेली असून वर्षातून फक्त एकच दिवस गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी म्हणजे फाल्गुन वद्य अमावास्येला रात्री या समाधीवरील भरजरी भगवे वस्त्र बाजूला काढून समाधीला मंगलस्नान घालून महापूजा केली जाते.



यंदा सोमवारी (दि.८) सूर्यास्त ते गुढीपाडव्याच्या सूर्योदयापर्यंत हा सोहळा चालणार आहे. यानिमित्त देशभरातून लाखो भाविक दर्शनासाठी गर्दी करतात.सोमवारी सूर्यास्तानंतर रात्री नऊ वाजता भाविकांनी तीर्थक्षेत्र पैठण येथून आणलेल्या गंगाजलाने समाधीस जलाभिषेक घालण्यात येईल. प्रत्येक भाविकाला समाधीस्नान घालण्याची संधी मिळते.कावडी स्नानानंतर विविध प्रकारच्या दुर्मिळ सुगंधी द्रव्यांनी समाधीवर उटणे,लेप लावले जाते. हा सोहळा मशालीच्या उजेडात चालतो. तसेच समाधीला स्पर्श करण्यासाठी भाविकांना स्नान करून ओल्या वस्त्रानिशी येणे बंधनकारक असते. या सोहळ्यासाठी महिलांना मात्र परवानगी नसून पूर्वापार चालत आलेली ही परंपरा आजही कटाक्षाने पाळली जाते.महास्नान व महापूजा सुरू असताना रात्रभर देवस्थान परिसर नगारे, डफ व शंख ध्वनीच्या निनादाने परिसर दुमदुमून जातो.भाविक सदगुरू बडे बाबा महाराज की जय'चा जयघोष करतात.पहाटे महाआरती होऊन सूर्योदयापूर्वी समाधीवर पुन्हा नवे भरजरी भगवे वस्त्र टाकून समाधी झाकली जाते.गुढीपाडव्याला दिवसभर दर्शनासाठी गर्दी करतात.वर्षातून एकदाच होणार्या या सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन देवस्थान समितीचे अध्यक्ष,सचिव,सर्व विश्वस्त व सावरगाव येथील ग्रामस्थांनी केले आहे.

# मनपा सीबीएई प्रियदर्शनी शाळेचा निकाल जाहीर

## मनपा प्रियदर्शनी शाळेत१५ एप्रिल पासून समर कॅम्पचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । सुनील वैद्य**

मनपाच्या केंद्रीय प्राथमिक सीबीएसई विद्यालय प्रियदर्शनी या शाळेचा वार्षिक परीक्षेचा निकाल आज जाहीर करण्यात आला.गुणवंत विद्यार्थ्यांना उपायुक्त अंकुश पांढरे व मुख्याध्यापक संजीव सोनार यांच्या हस्ते प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.प्रथम तीन विद्यार्थी ज्युनिअर केजी चे गुणवंत विद्यार्थी प्रथम विरांशी पखाले द्वितीय विनिष्का दाभाडे तृतीय प्रणाली दाभाडे सीनियर केजी चे गुणवंत विद्यार्थी प्रथम प्रांजल शिंदे द्वितीय ऐमन शेख , अश्र्वेद पाईकराव तृतीय मोहम्मद साद वर्ग पहिला प्रथम ओरियांशी पाखले द्वितीय क्रांती परांडे तृतीय जैनेब सय्यद. दित्या अनिल घनसावंत हिला स्टुडन्ट ऑफ द इयर हे मानांकन देऊन गौरविण्यात आले.



यावेळेस पालक सभेमध्ये उपायुक्त अंकुश पांढरे यांनी मुलांच्या प्रगतीचे कौतुक केले. तसेच येणाऱ्या लोकसभा निवडणुकीमध्ये सर्व पालकांनी मतदानामध्ये सहभाग घेऊन मतदानाचे टक्केवारी वाढवावी येणाऱ्या गुढीपाडवा सणानिमित्त गुढीपाडवा मतदान वाढवा ही घोषणा देऊन पालकांमध्ये जनजागृती केली.

पालकांनी ही आपले मनोगत व्यक्त करत असतांना निलोफर पठाण यांनी मनपा च्या शाळेत उत्तम शिक्षण मिळते .खाजगी शाळांपेक्षा मनपाच्या शाळांमध्ये असलेल्या सुविधा व मोफत शिक्षण यामुळे गोरगरिबांच्या मुलांना गुणवत्ता पूर्ण शिक्षक मिळत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

तसेच रुकैया सय्यद म्हणाल्या की मनपा शाळेबद्दलची पालकांमधील असलेली नकारात्मक भावना प्रियदर्शनी शाळेने बदलून टाकली आहे येथील मुख्याध्यापक व शिक्षक विद्यार्थ्यांसाठी घेत असलेली मेहनत व आमच्या पाल्यांमध्ये होणारा बदल हा निश्चित लक्षणीय आहे.मनपा आयुक्त जी श्रीकांत यांच्या प्रयत्नातून सर्व शाळांमध्ये टर्फ चे मैदान तसेच अनेक खेळाच्या सुविधा मिळत असल्याबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले व मनपा आयुक्त यांचे आभार मानले.मुख्याध्यापक संजीव सोनार यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये विद्यार्थ्यांसाठी १५ एप्रिल पासून समर कॅम्पचे आयोजन करण्यात येणार आहे असे पालकांना सांगितले.यावेळेस सीबीएसई समन्वयक शशिकांत उबाळे ,तसेच शिक्षिका तेजस्विनी देसले रश्मी होनमुटे स्वाती डिडोरे मनीषा पगडे उपस्थित होत्या.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904